REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचे धार्मिक आचरण

प्रा. डॉ. जे. एफ. पाटील
सह्योगी प्राध्यापक, मराठी विभाग ,
भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ.



आदिवासी जमातींचा धार्मिक जीवनाचा परिचय करून घेण्यापूर्वी प्रथमतः एकूणच मानवाच्या धर्मविषयक समजूती, कल्पनांबाबत पाश्चात्य मानववंशशास्त्रज्ञांनी मांडलेली मते लक्षात घेणे आवश्यक ठरते.

1. एडवर्ड टायलर : यांनी त्यांच्या 'प्रीमिटीव्ह कल्चर' या ग्रंथात ''धर्म म्हणजे अध्यात्मिक शक्तीवर विश्वास'' अशी व्याख्या केली आहे.
2. जेम्स फ्रेझरच्या मते ''धर्म म्हणजे निसर्ग व माववी जीवन यांना निर्देश देणाऱ्या, नियंत्रण करणाऱ्या व मानवापेक्षा श्रेष्ठ अशा शक्तींच्या संतुष्टीकरणाची व आराधनेची पध्दती होय.''
3. मॅलिनोवस्की यांनी ''धर्म हा श्रध्दा व विधी यांची व्यवस्था आहे. तसेच धर्म ही एक सामाजिक घटना व वैयक्तिक अनुभूती होय.'' असे मत मांडले आहे.
4. प्रा. बॅलार्ड – हे धर्माची व्याख्या करताना म्हणतात, ''सामाजिक परिस्थितीत आढळून येणाऱ्या अमूर्त, अदृश्य, अनोळखी व अप्रतिबंध अशा शक्तींशी मिळते–जुळते घेण्याची प्रक्रिया म्हणजे धर्म होय.''

याशिवाय 'मानवशास्त्रीय परिभाषा कोषात', मानव आणि पर्यावरणामधील संबंधाविषयीच्या संकल्पनेला निश्चित स्वरूप देणारी आणि प्रत्येक संस्कृतीत आढळणारी श्रध्दा व आचारण यांची व्यवस्था म्हणजे धर्म अशी व्याख्या केली आहे.

वरील विविध व्याख्यांवरून धर्माचे स्वरूप स्पष्ट होते. मानवापेक्षा श्रेष्ठ अशी कोणती तरी एक दिव्य, अलौकिक शक्ती असते. ती शक्ती संपूर्ण मानवी जीवन नियंत्रित करते अशी लोकांची श्रध्दा असते त्या श्रध्देशी संबंधीत आचरण, व्यवहार आणि कर्मकांड करणे म्हणजे धर्म होय.

धर्म ही एक सर्वव्यापी सामाजिक संकल्पना आहे. धर्माचे प्राबल्य प्राचीन अप्रगत आदिवासी समाजापासून ते आजच्या प्रगत समाजापर्यंत सर्वत्र आढळून येते. आदिवासींच्या जीवनातील आदिम अनुभवांची कल्पना केली असता, अरण्यात मुक्त, स्वतंत्र व स्वच्छंद जीवन जगणाऱ्या आदिवासींना तेथील काही गोष्टींचे गूढ व काहींचे फार भय असते. दिव्य शक्तीच्या अस्तित्वाबद्दलचा त्यांचा ठाम विश्वास असतो. माणसाचा जन्म, मृत्यू तसेच झोप व स्वप्न या गोष्टी त्याला आजही अनाकलनीय वाटतात. निसर्गाबद्दल आदरयुक्त भीती असते. निसर्गाच्या सामर्थ्याने ते चकीत होतात. त्यात घडणाऱ्या वारा, वादळ, पाऊस, गारा पडणे, विजा चमकणे, विज पडणे, भूकंप, ज्वालामुखी, नद्यांना येणारे पूर, समुद्रातील उंच लाटा व त्यातून घडणारी जीवितहानी इत्यादी गोष्टी केवळ अनाकलनीय नव्हे तर भयानक भीती निर्माण करणाऱ्या असतात.

एकीकडे निसर्गात वावरणाऱ्या पशूपक्ष्यांवर आपले वर्चस्व गाजविण्यात आदिवासी मागे हटला नाही. दगडांची, लाकडांची व नंतर लोखंडांची शस्त्रे करून जंगली हिंस्त्र प्राणीही त्याने आपल्या काबूत आणले व त्यांची शिकार केली. परंतु निसर्गातल्या वरील अद्भुत व दिव्य शक्तीसमोर मात्र हतबल होण्याशिवाय त्याला

दुसरा मार्ग नव्हता. त्यातून त्याने आपल्या मनाचा व बुध्दीचा वापर करून अशा नैसर्गिक दिव्य, अलौकिक शक्तींना आपल्या नियंत्रणात आणण्याच्या प्रयत्नातून जादू निर्माण झाली व त्यांना शरण जाण्याच्या प्रयत्नातून धर्म निर्माण झाला. म्हणजेच जीवितहानी करू शकणाऱ्या शक्तीच्या आराधनेने धर्माची सुरूवात झाली. त्यातून प्रथम निसर्गपूजा आणि नंतर मृतात्म्यांची पूजा यांचा समावेश होतो. म्हणून आदिवासी धर्मव्यवस्थेत जादू व धर्म या दोन्ही बाबी परस्परांशी संबंधीत, पूरक आहेत.

धर्म हा आदिवासींच्या संपूर्ण समाजजीवनाला नियंत्रणात आणण्याचे साधन आहे. निसर्गातील अलौकिक शक्ती असंतुष्ट होईल असे कोणतेही आचरण त्यांना मान्य नाही. कारण ही दिव्यशक्ती असंतुष्ट झाल्यास समाजाचा नाश होईल अशी त्यांची श्रध्दा असते. याबद्दल प्रदीप आगलावे लिहितात, ''.......आदिवासी समाजाचे जीवन हे तर निसर्गावर अवलंबून आहे. त्यांना आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी खूप परिश्रम करावे लागतात. त्यांचे जीवन अतिशय कष्टदायक असते. अनेक प्रयत्न करून देखील त्यांना यश मिळेलच याची शाश्वती नसते. शिकारीची सर्व तयारी करून देखील शिकार न मिळणे, जमिनीची योग्य ती मशागत करून देखील अनपेक्षित पाऊस, वादळ, गारपीट, पूर, किड इत्यादी कारणांमुळे पिकांची नासाडी होणे, शक्य ती सर्व काळजी घेऊनसुध्दा एखाद्या रोगराईने जनावरांचे कळप अकाली मृत्यूमुखी पडणे यासारख्या घटना नेहमीच आदिवासींच्या प्रत्ययास येत असतात.''[1] सर्वच आदिवासी लोकांच्या आचार–विचारात, जीवनविषयक दृष्टिकोनात समानता दिसून येण्याचे मुख्य कारण धर्म हेच आहे. म्हणून त्यांची धार्मिकता समजून घेतल्याशिवाय त्यांचे जीवन कळणे अशक्य होय. धर्मभावनेच्या मूळाशी त्यांची सामाजिकता असते. वस्तूतील पवित्र अपवित्र कल्पनेतूनच धार्मिक विधी, निषेध नियमांचा उदय झाला आहे. त्यामागील हेतूत देखील सामाजिकता असते. म्हणून आदिवासी समाजात सर्वत्र आचार–विचारात एक प्रकारची समानता दिसून येते.

➢ **आदिवासींमधील धर्मश्रध्दा :–** आदिवासी धर्मश्रध्देविषयी दोन सिध्दान्त सांगितले जातात :

**1) सर्वात्मवाद :–** आत्म्याचा अस्तित्वावरचा विश्वास म्हणजे सर्वात्मवाद होय. आत्मा अमर आहे, अविनाशी आहे. शरीराला सोडून गेलेला आत्मा भूत, पिशाच्च, देव अशा अलौकिक शक्तीच्या रूपात वावरत असतो अशी सर्वात्मवादाची मूळ कल्पना आहे. या अलौकिक शक्तीचे अस्तित्व तिन्ही लोकात असते. पाणी, हवा, अग्नीतून ही दिव्यशक्ती संचार करते. तिला रंग, रूप, आकार नसतो अशी आदिवासींची समजूत आहे. या दिव्य शक्तींचे मानवी जीवनावर नियंत्रण असते. त्यामुळे आदिवासी लोक हे पितरपूजा, देवपूजा व पिशाच्चपूजा करीत असतात. महाराष्ट्र व गुजरात मधील भिल्ल लोक मृतात्मा व भूत यांच्यावर विश्वास ठेवतात. तसेच परमेश्वराने ही पृथ्वी निर्माण केली असेही समजतात. ठाकूर, कोळी, आदिवासी हे आजही अनेक देवदेवतांची पूजाअर्चा करतात. त्यांचाही भूताखेतांवर विश्वास आहे. हडळी, खैस, मुंजा हे सर्व भूतांचे प्रकार आहेत असे ते मानतात.

**2) शक्तीवाद वा सचेतनवाद :–** जगातील प्रत्येक चेतन सजीव व अचेतन निर्जीव वस्तूंमध्ये असाधारण व विलक्षण अशी शक्ती वास करते अशी आदिवासींमध्ये समजूत असते, असा त्यांचा विश्वास असतो. आदिवासी लोकांना प्रत्येक वस्तूत वा पदार्थात एक जीवित शक्ती वा चैतन्य आढळते. याला सचेतनवाद किंवा जडचेतनवाद असे म्हणतात. ही शक्ती अदृश्य, अव्यक्त, अभौतिक व सामर्थ्यसंपन्न अशी असते. या शक्तीला रूप, रंग, आकार नसतो ती सर्व ठिकाणी संचार करते आणि ही शक्ती कधीच पराभूत होत नाही. ज्या व्यक्तीत व वस्तूत ही अलौकिक शक्ती संचार करते. ती व्यक्ती व वस्तू अलौकिक, असाधारण असते. एखाद्या व्यक्तीला त्याच्या क्षेत्रात जे प्रचंड यश मिळते त्याचे कारण हेच आहे. वेगवेगळया क्षेत्रातल्या प्रतिभावंत व्यक्तींमध्ये ही शक्ती संचारत असते. आदिवासी समाजातील नेता, शामन, वैद्य, गायक, वादक, नर्तक, उत्तम शिकारी या लोकांमध्ये या शक्तीचा संचार असतो असा त्यांचा विश्वास आहे.

➢ **आदिवासींमधील धार्मिक प्रथा :–** आदिवासींमध्ये अनेक धार्मिक प्रथा आहेत :

**1) देवकपूजा :–** देवकपूजा किंवा उपासना ही प्रथा आदिवासी जमातींमध्ये सर्वत्र आढळते. कुल किंवा गोत्र हा आदिवासी एकसंघतेचा प्रमुख आधार आहे. प्रत्येक कुटुंब कोणत्यातरी कुळाचे सभासद असते. तसेच प्रत्येक कुळाचे स्वतंत्र कुलचिन्ह वा देवकचिन्ह असते. उदा. – सूर्य, चंद्र, नाग, वाघ, वृक्ष, खांब वा काठी इत्यादी. या देवकचिन्हाबाबत कुळातील सदस्यांना फार आदर असतो. हे कुलचिन्ह स्वतःच्या अंगावर गोंधवून घेणे त्याचे चित्र देवघरात वा घरामध्ये लावणे, त्याची सामूहिकपणे, धार्मिक विधीद्वारा पूजा करणे आदींद्वारे आदिवासी आपल्या

देवकाची पूजा किंवा उपासना करतात. हे कुलचिन्ह असलेले प्राणी, पक्षी, वस्तू, घटक हे आपली पूर्वीपासून रक्षा करतात अशी त्यांची समजूत, श्रध्दा असते. म्हणून कुलचिन्ह असलेल्या प्राण्याची शिकार करणे, खाणे हे निषिध्द असते. उदा.– खानदेशातील आदिवासींची माऊलीपूजा, देवकाठी पूजा इत्यादी.

**2) पूर्वजपूजा :–** आदिवासींमध्ये आपल्या पूर्वजांची पूजा वा उपासना करण्याची प्रथा आजही रूढ आहे. आत्मा हा दिव्य प्राण्यांच्या स्वरूपात असतो अशी त्यांची दृढ श्रध्दा आहे. म्हणून ते देवपूजा, पितरपूजा करतात. याबद्दल गोविंद गारे लिहितात, ''.....आदिवासी आपल्या पूर्वजांना व पितरांना देव मानतात. भूत–पिशाचदेखील त्यांना देवासारखीच वाटतात. त्यांना ते चेडा, मुंजा, सुपली, वीर, हडळी, खैस इत्यादी नावांनी ओळखतात. दगडांचे किंवा लाकडाचे मुखवटे करून गावाच्या वेशीबाहेर उभी केलेली दैवते हे त्यांचे पूर्वज असतात.''[2] आदिवासींवर एखादे दुःख, संकट, आजारपण आले तर पितराचा कोप झाला. असे स्पष्टीकरण त्यांचा भगत किंवा शामन करतो व तो कोप दूर करण्याची उपाययोजनाही तोच सांगतो. उदा. सर्वपित्री अमावस्या पूजन.

**3) निसर्गपूजा :–** मूळातच आदिवासी समाज निसर्गपूजक आहे. याबद्दल गोविंद गारे लिहितात, ''आदिवासींच्या धार्मिक रूढी ह्या निसर्ग आणि प्राणिपूजेतून निर्माण झाल्या आहेत. निसर्गातील गूढ, अनाकलनीय ते सर्व पूजनीय असे ते मानतात. आकाशात चमकणारी वीज, सूर्य, चंद्र, तारे, ढग, प्रचंड वृक्ष, वाघ, सिंह, साप, विंचू अशा निसर्गनिर्मित सजीव, निर्जीव वस्तूंची आणि प्राण्यांची ते पूजा करतात.''[3] निसर्गातील प्रत्येक वस्तूत दिव्यशक्ती असते अशी त्याची दृढ श्रध्दा आहे. आदिवासी निसर्गाच्या सामर्थ्याने अवाक होतात. निसर्गाबद्दल त्यांच्यात आदरयुक्त भीती असते. निसर्ग हा आपला मित्र व शत्रूही आहे. अशी त्यांची भावना असते. म्हणून ते आपल्या कोणत्याही महत्त्वाच्या कामाची सुरूवात आणि शेवट निसर्गाच्या शक्तीपुढे नम्र होऊन करतात. सूर्य, चंद्र, आकाशातील तारे, वारा, अग्नी, जलाशय, वृक्ष, पर्जन्य पर्वत या नैसर्गिक शक्तींना ते देवदेवता मानतात. त्यांची पूजा करतात. उदा. होळीनिमित्त अग्नीची पूजा, मच्छिमार आदिवासीमध्ये जलपूजा तसेच माऊली विधी, वृक्षपूजा करतात. शेतात पिकांची रोपे तयार करण्यासाठी शेतातील पालापाचोळा गोळा करून भाजणी करीत असतात. त्यावेळी वाऱ्याने रौद्र रूप धारण करून इतरत्र आग पसरू नये व जंगलाचा नाश होऊ नये म्हणून वायूची पूजा केली जाते. महापूराचा कोप कमी व्हावा म्हणून नदीची खणा–नारळाने ओटी भरून जलदेवतेची पूजा केली जाते. म्हणजेच निसर्गपूजा ही आदिवासींची महत्त्वपूर्ण धार्मिक प्रथा आहे.

➢ **आदिवासींचे धार्मिक आचरण :–** आदिवासींचे धर्माचरणाबद्दल सुंदरसिंह ठाकूर लिहितात, ''अलौकिक शक्तीला प्रसन्न करण्यासाठी आदिम लोक ज्या कर्मकांड वा आचरण पध्दतीचा आधार घेतात. त्या सर्व विधींना आदिवासींचे धर्माचरण असे म्हटले जाते.''[4] आदिवासी जमातीत निसर्गातील अलौकिक वा दिव्य प्राण्याला शक्तीला प्रसन्न करण्यासाठी, धर्माधिष्ठीत आचरण, वर्तन आवश्यक असते. या विश्वासातून, श्रध्देतून ते आपले धार्मिक आचरण, वर्तन पुढीलप्रमाणे करतात :

**1) प्रार्थना :–** प्रार्थना हे आदिवासींच्या धार्मिक आचरणाचे प्रमुख अंग आहे. प्रार्थनेतून कोणत्याही दिव्यशक्तीला, देवाला प्रसन्न करून घेता येते असा त्यांचा ठाम विश्वास आहे. आदिवासी आपल्या कुलदेवतांची आराधना करताना विशिष्ट पध्दतीने प्रार्थना करतात. देवदेवतांचे एकट्याने किंवा गटाने प्राथनेद्वारा आवाहन केले जाते. नदीपूजा, वृक्षपूजा, पशुपूजा, पितरपूजा करतांनाही प्रार्थना केली जाते. उदा : कोकणा हे आदिवासी डोंगरी देवाला प्रसन्न करण्यासाठी मार्गशीर्ष पौर्णिमेस 8–10 दिवस पावरी वाद्य वाजवून सामूहीक डोंगरी देव उत्सव साजरा करतात. चांगला पाऊस पडावा म्हणून वरूण देवतेची प्रार्थना करतात.

**2) यज्ञ :–** आदिवासी लोक जेव्हा कोणत्याही दिव्य प्राण्याला किंवा शक्तीला संतुष्ट करण्यासाठी त्या शक्तीच्या नावे काही वस्तू वा प्राणी समर्पित करतात, अर्पण करतात त्याला यज्ञ म्हणतात. काही वेळा एक ओंजळभर पाणी शक्तीच्या नावाने घेतले जाते व विशिष्ट मंत्र म्हटल्यावर शिंपडले जाते. बऱ्याच वेळा देवदेवतांच्या नावाने बोकड किंवा कोंबड्याचा बळी दिला जातो. नंतर त्या प्राण्यांचे मांस व रक्त प्रसाद म्हणून वाटले जाते. महाराष्ट्रातील भिल्ल लोक हनुमानाला प्रसन्न करण्यासाठी दुधाचा नवैद्य दाखवितात. दिवाळीला शिवारातील देवदेवतांना शांत करण्यासाठी गावकरी सामूहिक कोंबडा बळी, बोकड बळी दिले जातात. तसेच माऊली पूजा केली जाते. ठाकूर लोक देवदेवतांना कोंबडा, बोकड समर्पित करतात इत्यादी अशा प्रकारे यज्ञ करणे हा आदिवासी धार्मिक आचरणाचे एक प्रमुख अंग आहे.

**3) धार्मिक विधी :–** आदिवासी जमातीत माणसाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत धार्मिक विधींची एक अखंड प्रक्रिया चालू राहते. अमूक एक विशिष्ट विधी केल्याने फायदा होतो व न केल्याने दुःख भोगावे लागते. असा त्यांच्यात दृढ समज आहे. धार्मिक विधी करीत असतांना व्यक्तीच्या विशिष्ट वर्तनालाच महत्त्व दिले जाते. उदा. – मूल जन्माच्या वेळीची सटवाईची पूजा, लग्नाच्या वेळेस तळी भरणे, जाऊळ पूजा, सत्यनारायणाची पूजा, माऊलींचा कार्यक्रम, मुलगा झाला नाही म्हणून निर्वासिताची स्थापना करून पूजा केली जाते. कोंबळा बळी दिला जातो. वसूबारसला गायपूजा तसेच नागपूजेला दुध चढविणे, वाघदेवपूजा वेळेस कोंबड्याचा बळी दिला जातो इत्यादी.

**4) निशेध नियम :–** धार्मिक विधीमध्ये काही गोष्टी केल्याच पाहिजे ही सकारात्मक बाजू आहे तर काही गोष्टी करण्यावर बंधने घातली जातात. ही नकारात्मक बाजू आहे व ही नकारात्मक बाजू म्हणजेच निषेध नियम किंवा 'वर्जन' नियम होय. उदा. – ठाकर जमातीत पिंपळ वृक्ष पवित्र मानला जातो म्हणून पिंपळाच्या फांद्या जाळत नाहीत. कोकणा समाज श्रावण सोमवारी मांस खात नाहीत. उंबराच्या फांद्या जाळत नाहीत तसेच एकादशी, महाशिवरात्र, शनिवार ते उपवास करतात. नागपंचमी, पोळा सणाला कुटुंब प्रमुख उपवास करतात, पोळा सण प्राण्यांचा सण म्हणून त्या दिवशी कोणत्याही प्राण्याची हत्या केली जात नाही. संक्रातीच्या दुसऱ्या दिवशी करी किंवा 'कर' ला शिकारीला जातात. गावात परिसरात साथीचा रोग दूर करण्यासाठी 'बोळावा' (दुःख बोळवण) केला जातो. पानाच्या द्रोणात कोंबडीचं लहान पिलू ठेवून ती बोळवण दुसऱ्या गावाला दिली जाते. पुढे ती दुसऱ्या गावाला दिली जाते. अशी ही बोळवण एका गावाकडून दुसऱ्या गावाकडे सतत पुढे चालू राहते. सत्यनारायण पूजा किंवा माऊली पूजा कार्यक्रमात मद्यप्राशन करीत नाहीत.

पवित्र वस्तू, पवित्र स्थळ यांचे पावित्र्य कोणत्याही प्रसंगी नष्ट होणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतली जाते. अशा या सामान्य निषेध–नियमांचा हेतू सामाजिक असतो. त्यामुळे आदिवासींमध्ये आचार–विचारात एक प्रकारची समानता येते, ते एकसंघ राहतात. निषेध–नियमांचे पालन केले नाही तर देवदेवतांचा रोष ओढवता, संकटे येतात अशी त्यांची दृढ श्रध्दा आजही टिकून आहे.

आदिवासींमधील वरील धार्मिक आचरणाबरोबर विशिष्ट सण–उत्सवाप्रसंगी नृत्य करणे, भोवाडा करणे, मिरवणूका काढणे इत्यादी सामूहिक गोष्टीही धार्मिक विधीचा एक भाग म्हणून केल्या जातात. मद्यपान हे तर आदिवासी धार्मिक जीवनाचे एक अविभाज्य अंग होऊन बसले आहे. एकूणच आदिवासींच्या धार्मिकतेबद्दल पुष्पा गावीत आपले मत व्यक्त करतात, ''आदिवासींच्या धर्माचा विचार केल्यास स्वातंत्र्यपूर्ण काळापासून आजपर्यंत चर्चिला जाणारा हा विषय आहे. तरीही सर्व अभ्यासक, तत्वज्ञ हे मान्य करतात की, आदिवासी निसर्गपूजक आहेत. वृक्ष, प्राणी ही त्यांची दैवते आहेत. त्यांची लोकनृत्य त्यांच्या सहज सुंदर जीवनाचा आविष्कार करतात. सण, उत्सव आणि विवाह प्रसंगी केली जाणारी नृत्य म्हणजे त्यांच्या आनंदी जीवनाचा अविभाज्य भाग असतात.''5 म्हणून आज ही बहुसंख्ये आदिवासी हे आपल्याला धार्मिक श्रध्देनुसार आचरण करीत आहेत.

## संदर्भ ग्रंथ :–

1) प्रदीप आगलावे, 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2004, पृ. 165
2) गोविंद गारे, 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2000, पृ. 14
3) तत्रैव, पृ. 14
4) सुंदरसिंह ठाकूर, 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र', निर्मल प्रकाशन, नांदेड, 2006, पृ. 139
5) पुष्पा गावीत, 'पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2011,पृ. 19